| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| MHKO110005112023 | दाखल दिनांक | - | २१/०३/२०२३ | | |
| | नोंद दिनांक | - | २४/०३/२०२३ | | |
| | निकाल दिनांक | - | १०/०३/२०२६ | | |
| | कालावधी | - | वर्ष | महीने | दिवस |
| | | | ०२ | ११ | १८ |

# प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठवडगाव
# यांचे न्यायालयात
## (पिठासिन अधिकारी - श्रीमती. आर. एस. मोरे)

## नियमित फौजदारी खटला क्र. ५४/२०२३
## नि. क्र.    / बी

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र शासन** तर्फे पोलीस ठाणे अधिकारी,<br>वडगांव पोलीस ठाणे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर |
| **अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ** | श्री. व्ही. पी. कुसुरकर, सहा. सरकारी अभियोक्ता. |
| **आरोपी** | **विनायक दिलीप पोवार,**<br>व.व. ३२, धंदा - मजुरी,<br>रा. लोहार गल्ली, खोची, ता. हातकणंगले,<br>जि. कोल्हापूर. |
| **आरोपी तर्फे विधिज्ञ** | श्री. डी. एम. जाधव |

### भाग–ब

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | १०/०१/२०२२ |
| गुन्हा रजिस्टर क्रमांक | २३/२०२२ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | २१/०३/२०२३ |
| दोषारोप ठेवलेचा दिनांक | २५/०६/२०२५ |
| साक्षीपुरावा सुरु झालेचा दिनांक | ०८/०९/२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | १०/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | १०/०३/२०२६ |
| दोषसिध्दी व शिक्षेबाबत आदेश | अंतिम आदेशाप्रमाणे |

## आरोपीविषयी माहिती

| अनु. क्र. | आरोपीचे नांव | आरोपीस अटक दिनांक | आरोपीस जामिनावर खुले केलेचा दिनांक | दोषारोपा- तील कलम | आरोपीस दोषमुक्त किंवा दोषसिध्द केले | आरोपीस झालेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **विनायक दिलीप पोवार** | ०६/०२/२०२२ | ०६/०२/२०२२ | भा.दं.वि.सं. कलम ३७९ अन्वये | निर्दोष मुक्तता | --- |

# न्यायनिर्णय

( आज दिनांक १० मार्च, २०२६ रोजी घोषित )

आरोपी विनायक दिलीप पोवार वर भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३७९ प्रमाणे गुन्हा केल्याबाबत दोषारोप आहे.

## अभियोग पक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे -

**०२.** दि. १०/०१/२०२२ रोजी सायंकाळी ०५.४५ वाजणेचे सुमारास पेठवडगाव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे फिर्यादी सुरेश श्रीपाल उपाध्ये हे पद्मारोड येथे भाजीपाला घेणेकरिता गेले असता अज्ञात इसमाने त्यांच्या खिशातून सॅमसंग A 32 कंपनीचा मोबाईल यांच्या संमतीशिवाय लबाडीच्या इरादयाने चोरून नेला. त्यानंतर फिर्यादी यांनी वडगांव पोलीस ठाण्यात जाऊन आरोपीच्या विरोधात तक्रार दाखल केली.

**०३.** सदर फिर्यादला अनुसरून आरोपीविरुद्ध वडगांव पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र.२३/२०२२ असा नोंद झाला. गुन्ह्याचा तपास वडगाव पोलिस ठाणे यांचेकडे सोपविण्यात आला. तपासी अधिकारी यांनी संबंधीत साक्षीदारांचे बयान नोंदवून घेतले, घटनास्थळाचा पंचनामा केला व आरोपीविरुद्ध फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १७३ प्रमाणे दोषारोपपत्र सादर केले.

**०४.** आरोपी हजर झाले असता **निशाणी क्र.०८** वर आरोपी वर भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३७९ अन्वये दोषारोप ठेवण्यात आला. सदर दोषारोप आरोपीला

मातृभाषेत वाचून व समजावून सांगण्यात आले. आरोपीने त्याच्यावरील आरोप नाकारून खटल्याची संपरिक्षा घेण्याची मागणी केली.

**०५.** अभियोग पक्षाने सदर प्रकरणात साक्षीदार क्र.१ - सुरेश श्रीपाल उपाध्ये, यांची साक्ष **निशाणी क्र.१३** वर नोंदवली आहे. अभियोग पक्षाने आपली भिस्त दि. १२/०१/२०२२ रोजीच्या जबाबा वरील फिर्यादीची सही - **निशाणी क्र.१४** कागदोपत्री पुराव्यावर ठेवली. आरोपीविरुद्ध कोणताही आक्षेपार्ह पुरावा अभिलेखावर न आल्यामुळे आरोपी यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वयेचे निवेदन नोंदवण्यात आले नाही.

**०६.** अभियोग पक्षाचे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. पी. कुसुरकर व आरोपींचे विद्वान विधिज्ञ श्री. डी. एम. जाधव यांचा युक्तिवाद ऐकला.

**०७.** दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून व अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केल्यानंतर माझे विवेचनाकरीता खालील मुद्दे उपस्थित झाले. त्या कामी कारणमीमांसेसह निष्कर्ष खालील प्रमाणे नोंदवले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष.** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले आहे काय की, दिनांक १०/०१/२०२२ रोजी सायंकाळी ०५.४५ वाजणेचे सुमारास पेठवडगाव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे आरोपीने फिर्यादीच्या मालकीचा सॅमसंग A 32 कंपनीचा मोबाईल त्यांच्या संमतीशिवाय लबाडीचे इराद्याने चोरून नेली ? | **नकारार्थी.** |
| २. | अंतिम आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

# कारणमिमांसा

**०८.** अभियोग पक्षाने तपासलेल्या फिर्यादी साक्षीदार क्र १ - सुरेश श्रीपाल उपाध्ये (अ.सा.क्र.१), यांनी त्यांच्या मौखिक पुराव्यादरम्यान असे नमूद केले आहे की, दि. १०/०१/२०२२ रोजी त्यांचा मोबाईल चोरीस गेला होता व त्यांनी अज्ञात व्यक्ती विरूध्द फिर्याद नोंदवली. त्यांना दि. १२/०१/२०२२ रोजीची फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर

त्यांची सही असल्याचे त्यांनी मान्य केले. परंतु मोबाईल कोणी चोरून नेला याचे नाव त्यांना माहित नाही. फिर्यादी यांच्या मालकीचा चोरीला गेलेला मोबाईल मे. कोर्टाच्या आदेशाप्रमाणे त्यांना परत मिळाला आहे. फिर्यादी व आरोपीची कोर्टाबाहेर तडजोड झाल्याचे त्यांनी मान्य केले.

**०९.** अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या फिर्यादी साक्षीदार क्र. १ यांनी अभियोग पक्षास सहकार्य करणारी साक्ष दिली नाही. सबब सरकारी वकिलांनी सदर साक्षीदारास फितुर घोषित करून उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परंतु सदर साक्षीदारांनी आरोपीविरुद्ध कोणतीही आक्षेपार्ह विधाने केली नाहीत. त्यामुळे अभियोग पक्षास सहकार्य होईल अशी कोणतीही महत्त्वाची कबुली सरकारी वकील सदर साक्षीदारांच्या तोंडून मिळवू शकले नाहीत. सदर साक्षीदाराच्या उलटतपासामध्ये त्यांनी सांगितले की, सी.सी.टी.व्ही फुटेज मधील आरोपी हा विनायक पवार नाही. फिर्यादी यांनी खात्रीनिशी सांगितले की, त्यांचा मोबाईल विनायक पवार ने चोरलेला नाही. आरोपीविरूध्द कोणतीही तक्रार राहीली नसलयाचे कथन केले.

**१०.** प्रस्तुत प्रकरणातील पुराव्याचे बारकाईने अवलोकन केले असता असे दिसून येते की, खटल्यातील फिर्यादी यांच्या मौखिक पुराव्यामध्ये आरोपीने चोरी केल्याची घटना नाकारलेली आहे. तसेच अभियोग पक्षाच्या वकिलांमार्फत विचारण्यात आलेल्या उत्तरसुचक प्रश्नांना सदर साक्षीदार यांनी नकारार्थी उत्तरे दिली असून त्यांनी आरोपीविरुद्ध कोणतीही दोष सिद्ध होतील अशी विधाने केली नाहीत. त्यामुळे अभियोग पक्षास सहकार्य होईल अशी कोणतीही महत्त्वाची कबुली सरकारी वकील सदर साक्षीदारांच्या तोंडून मिळवू शकले नाहीत. यावरून फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये घडलेल्या घटनेबाबत संशय निर्माण होत आहे. तसेच प्रस्तुत कामातील मूळ फिर्यादी यांनी **निशाणी क्र.१२** वर पुरसिस दाखल करून आरोपी यांचे विरूध्द कोणतीही तक्रार राहिली नसल्याचे कथन केले. नि. १ च्या आदेशानुसार अभियोग पक्षाचे पुरावे बंद करण्यात आले.

**११.** सदर प्रकरणी आरोपीविरुध्द गुन्ह्याचे सिध्दतेकरीता अभियोग पक्षातर्फे सादर करण्यात आलेल्या तोंडी व लिखीत पुराव्याचे अवलोकन केले असता चोरी सारख्या गुन्ह्यामध्ये जरी प्रत्यक्षरित्या चोरी होत असताना आरोपीस पाहणे महत्वाचे नसले तरीही

परिस्थितीजन्य पुराव्यावरुन चोरीचा गुन्हा सिध्द होवू शकतो. वरील प्रमाणे गुन्हा सिद्ध करण्याकरीता फिर्यादी यांची साक्ष महत्त्वाची असते. परंतू या प्रकरणातील फिर्यादी हे फितुर झालेले आहेत. फिर्यादी यांनी आरोपीने मोबाईल चोरला नसल्याचे कथन केल्यामुळे त्याच्याविरूध्द प्रकरण पुढे चालविण्यात काही अर्थ नाही. उपरोक्त फिर्यादी यांनी त्यांचे पुराव्यात आरोपीने चोरी केलेबाबत अवाक्षरही काढलेले नाही. एकंदर घटना घडली असलेबाबत तसेच आरोपीने फिर्यादीच्या मालकीचा मोबाईल हा त्याच्या संमतीशिवाय लबाडीचे इराद्याने चोरी केलेबाबत सकारात्मक पुरावा अभिलेखावर नाही. स्वत: फिर्यादी यांना आरोपी विरूध्द तक्रार राहीली नसल्याने प्रकरण पुढे चालविण्यात काही अर्थ नाही. चोरीची घटना नाकारत असल्यामुळे त्यामुळे अभियोग पक्षाच्या कथनास पुरेसे बळ मिळत नाही. त्यामुळे फिर्यादी पक्षाच्या कथनाबद्दल संशय उत्पन्न होतो व त्याचा फायदा मिळण्यास आरोपी पात्र ठरतो.

१२. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदाराच्या साक्षी पुराव्याचे अवलोकन करता, दि. १०/०१/२०२२ रोजी सायंकाळी ०५.४५ वाजणेचे सुमारास पेठवडगाव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे फिर्यादी सुरेश श्रीपाल उपाध्ये हे पद्मारोड येथे भाजीपाला घेणेकरिता गेले असता अज्ञात इसमाने त्यांच्या खिशातून सॅमसंग A 32 कंपनीचा मोबाईल यांच्या संमतीशिवाय लबाडीच्या इरादयाने चोरून नेला, हे अभियोग पक्षाने निःसंशय सबळ पुराव्यानिशी शाबीत केलेले नाही. **निशाणी क्र. १२** च्या पुरसिस नुसार फिर्यादी यांची आरोपी विरूध्द तक्रार राहीलेली नसल्याचे दिसून येते. अभियोग पक्षाने सदरचा गुन्हा निःसंशय सबळ पुराव्यानिशी शाबीत केलेले नाही, त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

**मुद्दा क्र.०२ करिता** -

१३. मुद्दा क्र.१ करिता मी माझे निष्कर्ष नकारात्मक नोंदवलेले आहेत. आरोपीवरील आरोप अभियोग पक्षाने रास्त संशयापलीकडे सिद्ध केलेले नाहीत. त्यामुळे आरोपी संशयाचा फायदा मिळण्यास पात्र आहेत. सबब, आरोपी त्याच्यावरील आरोपांमधून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. तसेच, चोरीस गेलेला मोबाईल हा फिर्यादी यांच्या मालकीचा असून तो त्यांच्या ताब्यात दिलेला आहे. वरील सर्व कारणांच्या विवेचनावरून, मुद्दा क्र.०२ चे निष्कर्षाकरिता मी

खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

# आदेश

| | |
|---|---|
| १. | फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये आरोपी **विनायक दिलीप पोवार** यांची भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३७९ मधील गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचे बंधपत्र व जामीनकतबा रद्द करण्यात येत आहे. |
| ३. | आरोपीस असे निर्देशित करण्यात येते की, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ अन्वये या न्यायालयाचे न्यायनिर्णयाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपील अथवा अर्ज दाखल झाल्यास त्यांच्यासमोर हजर रहाण्याकरिता सहा महिन्यांच्या कालावधीकरिता त्यांनी रक्कम रु.१५,०००/- रकमेचा जामीन द्यावा. |
| ४. | प्रस्तुत प्रकरणामध्ये जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सॅमसंग कंपनीचा गॅलेक्सी A 32 मॉडेलचा मोबाईल त्याचा IMEI no. 353089181281631 व 354882671281635 यांचा अंतरिम ताबा मूळ मालक यांच्याकडे, फौज. किर. अर्ज क्र.१०१/२०२२ नुसार देण्यात आला आहे. अपील कालावधीनंतर सदरचा ताबा तसाच कायम करण्यात यावा. |
| ५. | सदर निकालाची एक प्रत माहितीकरिता मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे पाठविणेत यावी. |

( खुल्या न्यायालयात जाहीर व उदघोषित करण्यात आला.)

sd/-

**पेठ-वडगांव** **( आर.एस.मोरे )**

**दिनांक – १०/०३/२०२६** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठ-वडगांव**

# भाग–क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

## अभियोग पक्षातर्फे घेतलेल्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी क्रमांक | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | सुरेश श्रीपाल उपाध्ये | १३ | फिर्यादी |

## अभियोग पक्षातर्फे सिध्द केलेले दस्तऐवज

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १ | अ.नि.क्र. १४/ अ.सा.क्र.१ | १२/०१/२०२२ रोजीच्या जबाबा वरील फिर्यादीची सही |

**sd/-**

**पेठ-वडगांव** **( आर.एस.मोरे )**

**दिनांक – १०/०३/२०२६** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठ-वडगांव**